ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शैक्षणिक सेवा विभाग

## मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C07) : माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2021–2022**

# मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम

## शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code : C07)

*अनुक्रमणिका*


**१. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय ........ ३**

**२. शिक्षणक्रमाविषयी ........ ३**

२.१ शिक्षणक्रमाची संरचना

२.२ अध्ययनपद्धती

**३. प्रवेश पात्रता ........ ४**

**४. शिक्षणक्रम शुल्क ........ ४**

**५. कालावधी ........ ४**

**६. माध्यम ........ ४**

**७. मूल्यमापन प्रक्रिया ........ ५**

७.१ अंतर्गत मूल्यमापन

७.२ अंतिम परीक्षा

**८. श्रेयांक ........ ७**

**९. अभ्यासकेंद्रे ........ ७**

**१०. विभागीय केंद्रे ........ ९**

**११. विशेष सूचना ........ ९**

**१२. संपर्क ........ १०**

# १. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय

शैक्षणिक सेवा विभाग (Academic Services Division) हा विद्यापीठातील एक महत्त्वाचा शैक्षणिक विभाग आहे. गरजाधारित शिक्षणक्रमांच्या पाठ्यक्रमांची आखणी, अंमलबजावणी तसेच उच्च दर्जाच्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करणे व त्यासाठी दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे या विभागाने आपले ध्येय मानले आहे.

शैक्षणिक सेवा विभागाकडून 'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम' हा शिक्षणक्रम राबविला जातो. तसेच 'संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' (Certificate Programme in Counsellor Training), 'गांधी विचार दर्शन पदविका' हे शिक्षणक्रमही शैक्षणिक सेवा विभागाकडून राबविले जातात.

# २. शिक्षणक्रमाविषयी

मानवी हक्कांची मूलभूत संकल्पना सर्वदूर स्पष्ट व्हावी या हेतूने सदर शिक्षणक्रमाचे विकसन करण्यात आलेले आहे. मानवी विकासासाठी मानवी अधिकाराधिष्ठित दृष्टिकोन विकसित होणे आवश्यक आहे व त्यासाठी हा शिक्षणक्रम उपयुक्त आहे.

भेदभावरहित समाजाची गरज सर्वांनाच जाणवते. समतेची संकल्पना या शिक्षणक्रमामुळे अधिक स्पष्ट होते. आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या प्रमाणकांचा, हमीचा व संस्थांचा ऐतिहासिक विकास आणि भारतास त्या कशा बंधनकारक आहेत याची जाणीव या शिक्षणक्रमामुळे होईल.

## ■ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

(१) गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांमधील (NGO) कार्यकर्त्यांना हा शिक्षणक्रम अत्यंत उपयुक्त आहे. या कार्यकर्त्यांचे मानवी हक्कांविषयीचे औपचारिक ज्ञान त्यामुळे वाढणार आहे.

(२) विधीशाखेचे विद्यार्थी, समाजविज्ञान किंवा समाजकार्य शाखेचे विद्यार्थी, शिक्षणशास्त्रशाखेचे विद्यार्थी, व्यवस्थापनशास्त्राचे विद्यार्थी यांना हा शिक्षणक्रम अत्यंत उपयुक्त आहे.

(३) सदर शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांस मुक्त विद्यापीठाच्या बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेताना दोन गुणांचा भारांक (प्रवेशास प्राधान्य) मिळू शकतो.

(४) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी शिक्षणाच्या सर्व स्तरावर 'मानवी हक्कांविषयीचा भाग' पाठ्यक्रमात समाविष्ट करावा असा आग्रह धरला आहे. (पत्र क्र. SHRC/MF/10/2010 दि. २८/१०/२०१०) या पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनानेही उच्च शिक्षणात 'मानवी हक्काचा भाग' समाविष्ट करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यास सांगितले आहे. (पत्र क्र. संकीर्ण–२०१०/(३८८/१०) विशि–३, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १६ नोव्हेंबर, २०१०). प्राथमिक, माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयीन तसेच विद्यापीठीय शिक्षकांनी 'मानवी हक्काविषयीचे' शिक्षणक्रम पूर्ण करणे उपयुक्त ठरणार आहे.

(५) विविध दैनिके, नियतकालिकांमध्ये काम करणारे पत्रकार व पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना सदर शिक्षणक्रम उपयुक्त आहे.

## २.१ शिक्षणक्रमाची संरचना

'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम' हा सहा महिने कालावधीचा व १२ (बारा) श्रेयांकांचा आहे. एकूण ३०० गुणांच्या या शिक्षणक्रमाची रचना अंतिम लेखी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन (अहवाल लेखन व कात्रण संग्रह) अशी आहे. प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर्सची अंतिम लेखी परीक्षा होईल. सदर शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम व पुस्तके पुढीलप्रमाणे:

| *अ.क्र.* | *अभ्यासक्रमाचे शीर्षक व पुस्तके* | *अभ्यासक्रम संकेतांक* | *एकूण संपर्कसत्रे* |
|---|---|---|---|
| १. | **मानवी हक्क : मूलभूत संकल्पना व ऐतिहासिक वाटचाल**<br>पुस्तक १ : मानवी हक्क आणि मूलभूत संकल्पना<br>पुस्तक २ : मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल | HRC 001 | ०७ |
| २. | **मानवी हक्क आणि भारत**<br>पुस्तक १ : मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना<br>पुस्तक २ : मानवी हक्कांच्या अंमलबजावणी यंत्रणा | HRC 002 | ०७ |

या शिक्षणक्रमातील दोन अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी सात (म्हणजे एकूण मिळून चौदा) आणि कात्रणसंग्रहनिर्मिती व प्रकल्प अहवाल मार्गदर्शन यासाठी एकूण चार संपर्कसत्रे अशी संपूर्ण शिक्षणक्रमांसाठी एकूण मिळून चौदा + चार = अठरा संमंत्रण सत्रे आहेत.

## २.२ अध्ययनपद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही; तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

(१) स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके.

(२) तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन.

(३) अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय.

(४) आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी.

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. ही स्वयं-अध्ययन पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ, उदाहरणे, आलेख, चित्रे, इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. पुस्तकात प्रत्येक पृष्ठावर दोन्ही बाजूंना मोठा समास सोडलेला असतो. या कोऱ्या जागेत विद्यार्थी ठळक मुद्दे लिहून ठेवू शकतो, त्याला येणाऱ्या शंकांची नोंद करून ठेवू शकतो. अभ्यासविषयाची आवृत्ती करताना या नोंदींची व टिपणांची त्याला मदत होते. तसेच पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्याने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकत नाहीत तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांशी (समंत्रक - Counsellor) चर्चा करून त्याची उत्तरे मिळविता येतात. विद्यार्थ्याला आपल्या सोईच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुटीच्या दिवशी वा कार्यालयीन वेळेनंतर संपर्कसत्रे घेण्यात येतात. त्या त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची/शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर चर्चा-परिसंवाद घडवून आणणे, अंतर्गत मूल्यमापनाच्या माध्यमांतून आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. म्हणून संपर्कसत्रांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.

विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीतजास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

## ३. प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण करणाऱ्या व्यक्तीस सदर शिक्षणक्रमास प्रवेशपात्र समजले जाईल.

(१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.

(२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी.

(३) मुक्त विद्यापीठाचा मानवी हक्कांचा उद्बोधन शिक्षणक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी.

टीप : प्रवेश पात्रता नसतानाही एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यास त्यास तो विद्यार्थीच सर्वस्वी जबाबदार राहील. अशा विद्यार्थास प्रवेश शुल्क परत दिले जाणार नाही.

## ४. शिक्षणक्रम शुल्क

या शिक्षणक्रमाचे एकूण शुल्क रु. १८००/- (एक हजार आठशे) आहे. त्यापैकी **विद्यापीठाचा हिस्सा रु. ११००/- असून** तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच **अभ्यासकेंद्र हिस्सा रु. ७००/- असून** अभ्यासकेंद्र हिश्याची रक्कम अभ्यासकेंद्रात ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

**महत्त्वाचे :**
**विद्यार्थ्यानी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.**

**टीप :** विद्यार्थ्याने नोंदणी रद्द केली वा अन्य कोणत्याही कारणाने प्रवेश शुल्क परत केले जाणार नाही.

## ५. कालावधी

सदर शिक्षणक्रम सहा महिने कालावधीचा आहे. विद्यार्थ्याने नोंदणी केल्यापासून त्याची नोंदणी दोन वर्षे ग्राह्य धरली जाते. पुनर्नोंदणीची सुविधा नाही.

## ६. माध्यम

विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेत वा अंतर्गत मूल्यमापनाच्या भागासाठी हिंदी / इंग्रजी / मराठीतून उत्तरे लिहिता येतील. अध्ययन साहित्य, समंत्रण, प्रश्नपत्रिका मात्र मराठी व इंग्रजीतूनच उपलब्ध होईल.

# ७. मूल्यमापन प्रक्रिया

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे केले जाते.

**मूल्यमापनाचा तपशील**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अंतर्गत मूल्यमापन | अंतिम परीक्षा | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | मानवी हक्क : मूलभूत संकल्पना व ऐतिहासिक वाटचाल | अहवाल लेखन : ५० गुण | १०० गुण | १५० गुण |
| २. | मानवी हक्क आणि भारत | कात्रण संग्रह व अहवाल लेखन : ५० गुण | १०० गुण | १५० गुण |
| | एकूण | १०० गुण | २०० गुण | ३०० गुण |

## ७.१ अंतर्गत मूल्यमापन

तज्ज्ञांद्वारे तुमच्या प्रगतीचा आढावा घेऊन अभ्यासासाठी दिशा दाखविण्याकरिता अंतर्गत मूल्यमापनाची सोय केलेली आहे. ह्यात महत्त्वाचे म्हणजे मानवी हक्कांवरील पुस्तक वाचून तुम्हांला प्रात्यक्षिकाचा भाग चांगल्या प्रकारे हाताळता यायला हवा. पुस्तकातला काही भाग समजला नसेल किंवा काही संकल्पना स्पष्ट होत नसतील तर तुम्ही तुमच्या संमंत्रकाद्वारे तो भाग अधिक समजावून घेऊ शकाल.

अंतर्गत मूल्यमापन प्रत्येक अभ्यासक्रमात ५० गुण असे एकूण १०० गुणांसाठी आहे. यात आपणांस खाली दिलेल्या यादीपैकी प्रत्येकी एका क्षेत्रावर 'भारतातील मानवी हक्कांची पूर्तता' या विषयाच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्य करून (७.१.१ साठी व ७.१.२ साठी दोन वेगवेगळे) अहवाल सादर करावयाचे आहेत.

- पुढे दिलेल्या ७.१.१ मधील व ७.१.२ मधील याद्यांमधून प्रत्येक यादीतील एक विषय निवडून ५० गुणांसाठी प्रत्येकी एक प्रकल्प अहवाल सादर करावा. हा अहवाल तयार करताना अभ्यासकेंद्रावरील संमंत्रक तुम्हांला वेळोवेळी मार्गदर्शन करतील. हा अहवाल तुम्ही अभ्यासकेंद्र समन्वयकांकडे जमा करावयाचा आहे, ते त्याचे मूल्यमापन करून गुणदान यादीसह तो विद्यापीठातील 'परीक्षा नियंत्रकांकडे' पाठवतील. या प्रात्यक्षिक कार्यात पास होण्याकरिता तुम्हांला कमीत कमी ५०% गुण मिळविणे आवश्यक आहे, जे तुमच्या गुणपत्रिकेत अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणासोबत स्वतंत्ररित्या दर्शविण्यात येतील.

### ७.१.१ प्रकल्प अहवाल लेखन (HRC 001 या प्रथम अभ्यासक्रमासाठी)

HRC 001 : 'मानवी हक्क : मूलभूत संकल्पना व ऐतिहासिक वाटचाल', या अभ्यासक्रमात तुम्ही मानवी हक्कांची तात्त्विक भूमिका व विकास समजावून घेतल्यानंतर तुम्ही राहात असलेल्या भागाचे, आजूबाजूच्या परिस्थितीचे अवलोकन करून खालील यादीतील एक विषय अभ्यासकेंद्र समन्वयक व संमंत्रक यांच्याशी चर्चा करून ठरवावा व त्यांच्या मार्गदर्शनानुसार अहवाल लेखन करून समन्वयकास सादर करावा. या प्रात्यक्षिकात मानवी हक्कांच्या मूलभूत संकल्पना व आंतरराष्ट्रीय बील ऑफ ह्यूमन राईटस्च्या परिप्रेक्षातून मांडणी करता येईल; यातून HRC 001 हा अभ्यासक्रम आपण अभ्यासला आहे व तो आपणांस समजला आहे हे स्पष्ट होईल.

**विषय सूची**

(०१) मानवी हक्क व स्त्रिया
(०२) बालकांचे हक्क
(०३) शिक्षणाचा हक्क
(०४) आरोग्य सेवा – सुविधांचा हक्क
(०५) अपंगांचे हक्क
(०६) अल्पसंख्याकांचे हक्क
(०७) निवासाचा हक्क
(०८) अन्न मिळविण्याचा हक्क (उदा. स्वस्त धान्य पुरवठा योजना)
(०९) मानवी हक्क व असंघटित मजूर
(१०) अनुसूचित जाती, जमातींचे हक्क
(११) वेठबिगारी
(१२) स्त्रिया व बालकांची अनैतिक वाहतूक
(१३) एच.आय.व्ही. / एड्स बाधितांचे हक्क
(१४) प्रकल्पग्रस्तांचे हक्क
(१५) देखरेखीखालील व्यक्तींच्या संदर्भात होणारी हिंसा (उदा. सुधारगृहे, मनोविकलांगांची आश्रयगृहे, आधाराश्रम, पोलिस कोठडी, तुरुंग, इत्यादी)
(१६) राष्ट्रीय / राज्य मानवी हक्क आयोग
(१७) मानवी हक्क व विकासाच्या संधीचा अभाव
(१८) मानवी हक्क व शासन – प्रशासन
(१९) माहितीचा अधिकार

### ७.१.२ मानवी हक्कांसंबंधी प्रसारमाध्यमांतील घटनांचा कात्रण संग्रह व अहवाल लेखन (HRC 002 या दुसऱ्या अभ्यासक्रमासाठी)

HRC 002 : 'मानवी हक्क आणि भारत' या अभ्यासक्रमात तुम्ही मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या देखरेख यंत्रणांचा अभ्यास कराल. या यंत्रणा समजून घेतल्यानंतर पहिल्या प्रात्यक्षिकात घेतलेला विषय वगळून खालीलपैकी कोणत्याही एका विषयाच्या संदर्भात प्रसारमाध्यमांनी घेतलेल्या आढाव्यांचा कात्रण संग्रह करावा व त्यावर स्वतःचे आकलन व विश्लेषणात्मक भाष्य करणारा एक प्रकल्प अहवाल सादर करावा.

मानवी हक्क हननाच्या घटना, घडामोडी व मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या देखरेख यंत्रणांची कामगिरी, अथवा भारतीय राज्यघटना व विशेषकरून मूलभूत हक्क, अथवा मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भात केंद्र / राज्य सरकारांची कामगिरी या परिप्रेक्षातूनही या प्रात्यक्षिकातील मांडणी करता येईल. यातून HRC 002 हा अभ्यासक्रम आपण अभ्यासला आहे व तो आपणास समजला आहे हे स्पष्ट होईल.

**विषय सूची**

(०१) मानवी हक्क व स्त्रिया

(०२) बालकांचे हक्क

(०३) शिक्षणाचा हक्क

(०४) आरोग्य सेवा – सुविधांचा हक्क

(०५) अपंगांचे हक्क

(०६) अल्पसंख्याकांचे हक्क

(०७) निवासाचा हक्क

(०८) अन्न मिळविण्याचा हक्क (उदा. स्वस्त धान्य पुरवठा योजना)

(०९) मानवी हक्क व असंघटित मजूर

(१०) अनुसूचित जाती, जमातींचे हक्क

(११) वेठबिगारी

(१२) स्त्रिया व बालकांची अनैतिक वाहतूक

(१३) एच.आय.व्ही. / एड्स बाधितांचे हक्क

(१४) प्रकल्पग्रस्तांचे हक्क

(१५) देखरेखीखालील व्यक्तींच्या संदर्भात होणारी हिंसा (उदा. सुधारगृहे, मनोविकलांगांची आश्रयगृहे, आधाराश्रम, पोलिस कोठडी, तुरुंग, इत्यादी)

(१६) राष्ट्रीय / राज्य मानवी हक्क आयोग

(१७) मानवी हक्क व विकासाच्या संधीचा अभाव

(१८) मानवी हक्क व शासन – प्रशासन

(१९) माहितीचा अधिकार

याशिवाय इतर अनेक नाविन्यपूर्ण पद्धतीने मानवी हक्क या विषयावर प्रकाश टाकता येईल; जसे तुमच्या भागात लोकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी विविध स्तरावर काम करणाऱ्या/लढणाऱ्या व्यक्ती/अधिकारी/संस्था, कर्मचारी यांच्या मुलाखती घेऊन अहवाल लेखन करता येईल.

प्रत्यक्ष क्षेत्रभेटींवर अहवाल लेखन किंवा प्रत्यक्ष घटनास्थळांना/बाधितांना/संस्थांना भेटी देऊन क्षेत्रीय पाहणीतील तपशील/निरीक्षणांवर आधारित अहवाल सादर करता येईल. या अहवालाच्या शेवटी समस्येच्या संदर्भात विश्लेषक भाष्य करणारा निबंध जोडणे आवश्यक असेल.

### ७.१.३ अहवाल लेखनाचे स्वरूप

सदर दोन्ही अहवाल प्रत्येकी एक हजार शब्दांपर्यंत असावेत. या प्रकल्प अहवालास अनुक्रमणिका व पृष्ठक्रमांक द्यावेत. जरूर तेथे शीर्षके, उपशीर्षके द्यावीत. निबंध शेवटी जोडून पुठ्ठा बांधणी/स्पायरल बायडिंग करून प्रकल्प अहवाल (दोन्ही वेगवेगळे)सादर करावा; मात्र तो खूप खर्चीक करू नये. त्यात मार्गदर्शक समंत्रकांचे प्रमाणपत्र अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

**प्रत्येक प्रकल्प अहवाल लेखनात पुढील मुद्दे अपेक्षित आहेत.**

(१) **विषयाची निवड** : विषय निवडीचा हेतू, महत्त्व, व्याप्ती.

(२) **कार्यपद्धती** संख्या– : मुलाखती, प्रश्नावली, प्रतिसादकांची निश्चिती, त्यांचे स्वरूप, निकष.

(३) **मांडणी** : (अ) माहितीचे पृथक्करण, विश्लेषण व निष्कर्ष
(आ) पूरक संदर्भांचा वापर
(इ) अहवालाचे तंत्रशुद्ध सादरीकरण व निष्कर्षांची मांडणी

(४) **सादरीकरण** : (अ) अहवाल १००० शब्दांत ए४ आकाराच्या चांगल्या प्रतीच्या कागदावर डी.टी.पी. केलेला असावा.
(आ) याखेरीज कात्रणे, चित्रे, प्रश्नावली, संदर्भसाधनांची सूची असा स्वतंत्र विभाग करावा.

समंत्रकाने प्रकल्पाचे मूल्यमापन करून ५० पैकी गुण द्यावेत. अभ्यासकेंद्र संयोजकाने गुणदानयादी दिलेल्या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा नियंत्रकांकडे पाठवावी.

- यात मिळालेले गुण गुणपत्रकामध्ये अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांबरोबर स्वतंत्र दर्शविण्यात येतील.

## ७.२ अंतिम परीक्षा

- शिक्षणक्रमाच्या शेवटी तुमचे मूल्यमापन करण्याकरिता अंतिम परीक्षा घेण्यात येईल.
- प्रत्येक अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी अंतर्गत मूल्यमापनात किमान ५०% व अंतिम परीक्षेत स्वतंत्रपणे किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य राहील.
- तुमच्या गुणपत्रकात प्रात्यक्षिक कार्यात मिळालेले गुण स्वतंत्र जरी दर्शविलेले असले तरी अंतर्गत व अंतिम मूल्यमापनातील गुण एकत्रित करून गुणांची टक्केवारी काढण्यात येईल.

## ८. श्रेयांक

सामान्यतः एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका' च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम' हा एकूण बारा श्रेयांकांचा आहे.

## ९. अभ्यासकेंद्रे

महाराष्ट्रात 'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची' पुढील ठिकाणी अभ्यासकेंद्रे आहेत. विद्यार्थ्यांनी या अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्रांना उपस्थित राहावे.

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| ०१. | वनराई यूथ फाऊंडेशन ए-७०, कलेक्टर कॉलनी अकोला - ४४४००१ | 1158A |
| ०२. | श्री शिवाजी आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज शिवाजीनगर, मोर्शी रोड राठी विद्यालयाजवळ अमरावती - ४४४६०३ | 1203A |
| ०३. | कै. छगनलाल मुळजीभाई कढी आर्टस कॉलेज, अचलपूर कॅम्प, परतवाडा अमरावती | 1205A |
| ०४. | कॉलेज ऑफ सोशल वर्क, युनिव्हर्सिटी रोड कॅम्प, अमरावती | 12131 |
| ०५. | नारायणराव नागरे कला व वाणिज्य महाविद्यालय, मु. पो. दुसरबीड ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा | 1352A |
| ०६. | कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, दूरदर्शन केंद्राजवळ वामन नगर, मु. पो. खामगाव, जि. बुलढाणा | 1392A |
| ०७. | जिजाऊ शिक्षण महाविद्यालय यवतमाळ - ४४५००१ | 1403A |
| ०८. | एडेड अध्यापक विद्यालय आर्णी रोड, दारव्हा, जि. यवतमाळ | 1472A |
| ०९. | त्यागी सेवामंडळाचे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन, गांधीनगर, चर्चजवळ यवतमाळ - ४४५ ००१ | 1473A |
| १०. | गुरूकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जवळा, जि. यवतमाळ-४४५१०५ | 14117 |
| ११. | अल मुबीन ज्युनियर कॉलेज उमरखेड, जि. यवतमाळ - ४४५ २०६ | 14124 |
| १२. | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय लाखाळी, वाशिम- ४४४ ५०५ | 1505A |
| १३. | स्व. गजानन माणिकरावजी गावंडे विज्ञान महाविद्यालय, स. न. १२७, एएनएल इन्फोव्हॅली कॅम्पस, चांदभारी चौक, वोलोडी रोड, खामगाव, जि. बुलढाणा | 13109 |
| १४. | नॅशनल एज्युकेशन सोसा.चे मातोश्री सायराबाई चंपालालजी चोपडा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सर्व्हे क्र.६७, प्लॉट क्र. ६३, टँक रोड, कॉटन मार्केटच्या मागे, खामगाव - ४४४३०३ जि. बुलढाणा | 13147 |
| १५. | श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे रामकृष्ण बी.एड. कॉलेज, उत्तमनगर अमरावती | 12128 |
| १६. | श्रीमती पी.डी. पाटील कॉलेज ऑफ सोशल वर्क, खडकी, अकोला - ४४५ १०५ | 11129 |
| १७. | डॉ. नानासाहेब चिंचोलकर कनिष्ठ महाविद्यालय, मु. पो. वाडेगाव ता. बाळापूर, जि. अकोला | 11100 |
| १८. | सरस्वती भुवन कला, वाणिज्य महाविद्यालय सरस्वतीनगर, औरंगपुरा, औरंगाबाद - ४३१००१ | 2103A |
| १९. | मातोश्री डॉ. कांचन शांतीलालजी देसरडा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन डी.के.एम.एम. मेडिकल कॉलेज कॅम्पस गुरुगणेशनगर, पहाडसिंगपूरा, औरंगाबाद | 21187 |
| २०. | ओमशांती अध्यापक महाविद्यालय अंबड, जि. जालना | 2320A |
| २१. | अभिवन कॉलेज ऑफ आय.टी. अँड मॅनेजमेंट, २५, छत्रपती कॉलनी, तहसीलदार कार्यालयाजवळ, जुना जालना जि. जालना - ४३१ २१३ | 2351A |
| २२. | मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, मुं. पो. कुंभार पिंपळगाव ता. घनसांगवी, जि. जालना - ४३१ २११ | 2354A |
| २३. | श्री संत गुलाबबाबा हस्तकला कार्यानुभव अध्यापक विद्यालय, गणेशपूर चंद्रपूर - ४४२ ९०३ | 4157A |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| २४. | आठवले कॉलेज ऑफ सोशल वर्क<br>मु. पो. ता. चिमूर, जि. चंद्रपूर<br>चंद्रपूर – ४४२ ९०३ | 4259A |
| २५. | जयदुर्गा हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज<br>गौर नगर, ता. अर्जुनी मोर<br>जि. गोंदिया – ४४१ ७०१ | 4631A |
| २६. | राजकुमार केवलरामानी कन्या महाविद्यालय<br>साई वासन शाह चौक, जरीपटका<br>नागपूर – १४ | 44212 |
| २७. | श्री सदाशिवराव पाटील शिक्षण कामठी<br>संस्था द्वारा संचलित श्रीमती किशोरीताई<br>अध्यापक महाविद्यालय, कामठी जि. नागपूर | 44291 |
| २८. | महाराष्ट्र गांधी स्मारक निधी<br>३४९/२, कस्तुरबा भवन, बजाज नगर<br>नागपूर – ४४० ०१० | 44337 |
| २९. | डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क<br>महात्मा फुले कॉलनी, सारंगी (मेधे) रोड<br>वर्धा – ४४२ ००१ | 4577A |
| ३०. | न्यू लॉ कॉलेज,  लालटाकी रोड<br>अहमदनगर – ४१४ ००१ | 51128 |
| ३१. | ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे शिक्षणशास्त्र<br>महिला महाविद्यालय, मु. पो. दोंडाईचा<br>जि. धुळे – ४२५ ४०८ | 5278A |
| ३२. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल<br>वर्क, मु.पो. मोराणे (नकाणे),<br>जि. धुळे – ४२४१०१ | 52135 |
| ३३. | सानेगुरुजी फाउंडेशन, उमेद, २०६१<br>ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, शिरसोली<br>जि. जळगाव – ४२५ १२६ | 53158 |
| ३४. | पेठे विद्यालय, रविवार कारंजा<br>नाशिक – ४२२ ००१ | 54204 |
| ३५. | कला, वाणिज्य महिला महाविद्यालय<br>जेलरोड, नाशिकरोड, नाशिक – ४२२ ०१० | 54245 |
| ३६. | एन.बी.टी. लॉ कालेज<br>कॉलेजरोड, नाशिक – ४२२ ००५ | 54248 |
| ३७. | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल<br>सेल्फ गव्हर्मेंट, महानगरपालिका जुनी इमारत<br>न्यू पंडित कॉलनी, नाशिक – ४२२ ००२ | 54282 |
| ३८. | आश्रय संस्था व पुनर्वसन संस्था<br>निळगव्हाण, ता. मालेगाव,<br>जि. नाशिक | 54307 |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| ३९. | श्री. सुरुपसिंग हिऱ्या नाईक<br>शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर<br>जि. नंदुरबार | 5512A |
| ४०. | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल<br>सेल्फ गव्हर्मेंट, II[nd] फेज, ‘L’ बिल्डिंग<br>पिनाक मेमरीज, कोथरूड बस स्टँडजवळ<br>कोथरुड, पुणे – ४११ ०३८ | 62258 |
| ४१. | मराठा विद्या प्रसारक समाजाचे, जी. एम. डी.<br>आर्टस, बी. डब्ल्यू, कॉमर्स ॲण्ड सायन्स<br>कॉलेज, सिन्नर, जि. नाशिक – ४२२ १०३ | 54433 |
| ४२. | के.व्ही.एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, उमराळे रोड<br>मु. पो. दिंडोरी, जि. नाशिक – ४२२ २०२ | 54434 |
| ४३. | महात्मा फुले एम.एस.डब्ल्यू. आणि मातोश्री<br>झवेरीबेन मोतीलाल तुरखिया बी.एस.डब्ल्यू.<br>कॉलेज, काझीपूर रोड, मु. पो. ता. तळोदा,<br>जि. नंदुरबार – ४२५ ४१३ | 5558A |
| ४४. | सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय (कला व<br>वाणिज्य व विज्ञान)<br>केडगाव, ता. दौंड, जि. पुणे – ४१२ २०३ | 62168 |
| ४५. | प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड<br>कॉम्प्युटर स्टडीज, ब्लॉक डी–खखख,<br>प्लॉट नं. ३, मेहता हॉस्पिटलच्या मागे,<br>मुंबई पुणे रोड, चिंचवड, पुणे – ४११ ०१९ | 62154 |
| ४६. | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल<br>सेल्फ गव्हर्मेंट, बागल मार्केट, पहिला मजला<br>राजारामपुरी लेन नं. १, जनता बाजार<br>कोल्हापूर – ४१६ ००८ | 71179 |
| ४७. | शांती निकेतन<br>लोकविद्यापीठ परिसर, माधवनग रोड<br>सांगली – ४१६ ४१६ | 7202A |
| ४८. | कन्या महाविद्यालय<br>पो.बॉक्स नं. २९, छत्रपती शिवाजी नगर<br>मु. पो. ता. मिरज, जि. सांगली – ४१६४१० | 7280A |
| ४९. | दैनिक रत्नभूमि अभ्यासकेंद्र, ३/२५४<br>पत्रकार कॉलनी, रेल्वे स्टेशनसमोर<br>कुवरबाव, रत्नागिरी – ४१५ ६३९ | 7380A |
| ५०. | नामदार भाईसाहेब सावंत प्रतिष्ठानचे<br>कला व वाणिज्य महाविद्यालय<br>दोडा मार्ग,<br>जि. सिंधुदुर्ग – ४१६ ५१२ | 7444A |

| क्र. | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|
| ५१. | श्री. पंचम खेमराज महाविद्यालय सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग – ४१६५१० | 7451A |
| ५२. | मैत्री इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट विठ्ठलदर्शन, टागोरनगर, राजस्थानी हायस्कूलजवळ, लातूर – ४१३ ५१२ | 8467A |
| ५३. | संजीवनी महाविद्यालय, मु.पो. चापोली ता. चाकूर, जि. लातूर | 8491A |
| ५४. | दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महाविद्यालय, मु.पो.ता. भोकर, जि. नांदेड | 8576A |
| ५५. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन मु.पो.ता. अर्धापूर, जि. नांदेड – ४३१ ७०४ | 8577A |
| ५६. | विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंट कॉलेज बिसेन नगर, न्यू मोंढा, नांदेड – ४३१ ६०२ | 85208 |
| ५७. | कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी – ४३१५१४ | 87103 |
| ५८. | रेनबो कॉम्प्युटर्स, शिवाजीनगर हिंगोली – ४३१ ५१३ | 8801A |
| ५९. | शिवाजी कॉलेज, कोठलज रोड हिंगोली – ४३१५१३ | 8804A |
| ६०. | समर्थ महाविद्यालय, हिंगोली | 8860A |
| ६१. | लिट्ल किंग्ज इंग्लिश स्कूल वसमतनगर ता. वसमत, जि. हिंगोली – ४३१ ५२५ | 8824A |
| ६२. | कै. शामराव पाटील टाकळीकर व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर, मु. पो. धुप्पा, ता. नायगाव, जि. नांदेड | 85216 |
| ६३. | माता रत्नेश्वरी सेवाभावी शिक्षण संस्था धारी संचलित, श्री. गुरू गोविंदसिंगजी महाविद्यालय, धारी पो. विढवुपूरी, ता. लोहा जि. नांदेड – ४३१ ६०६ | 85222 |

## १०. विभागीय केंद्रे

(१) **अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड,
पोस्ट व्ही. एम. व्ही., अमरावती – ४४४ ६०४
✆ : (०७२१) २५३१४४४
फॅक्स : २५३१४४५

(२) **औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी, औरंगाबाद – ४३१ ००२
✆ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

(३) **मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक
ग्रँट रोड (प.) मुंबई – ४०० ००७
✆ : (०२२) २३८७४१८६ फॅक्स : २३८२६१३५

(४) **नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला
विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅंपस
रविनगर चौक, नागपूर – ४४० ००१
✆ : (०७१२) २५५३७२४ फॅक्स : २५५३७२५

(५) **नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत
दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी
नाशिक –४२२ ००२ ✆ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : २५७६७५६

(६) **पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका
शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ
हौदासमोर, कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
✆ : (०२०) २४४९११०७ फॅक्स : २४४५७९१४

(७) **कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर,कोल्हापूर – ४१६ ००४
✆ : (०२३१) २६०७०२२
फॅक्स : २६०७०२३

(८) **नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड – ४२१ ६०६
✆ : (०२४६२) २२९९४०
फॅक्स :०२४६२–२२९९५०

## ११. विशेष सूचना

### (अ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. तसेच विद्यापीठाचे संकेतस्थळही पहावे.

०२. विद्यापीठाशी आपण वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, इत्यादी कागदपत्रे जपून ठेवावीत. विद्यापीठ आपणास कायम नोंदणी क्रमांक (PRN = Permanent Registration Number) देते. प्रत्येक वेळेस पत्रव्यवहार करताना, अभ्याससाहित्य घेताना, परीक्षा देताना PRN लिहिणे आवश्यक आहे. PRN अभ्यासकेंद्रावरून मिळवावा.

०३. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा **'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.**

०४. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

०५. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणेच अंतिम परीक्षा परीक्षा केंद्रांवर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

०६. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल. सदर अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

## (आ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२. दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

**विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –**

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५
  (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

# १२. संपर्क

**१. शैक्षणिक मार्गदर्शन**

**प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
प्राध्यापक व संचालक
शैक्षणिक सेवा विभाग
दूरध्वनी : (०२५३) २२३००१०, २२३००४७

**प्रा. डॉ. हेमंत राजगुरू**
सहयोगी प्राध्यापक
शैक्षणिक सेवा विभाग
दूरध्वनी : (०२५३) २२३००१०

**२. नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल :**

उपकुलसचिव
नोंदणी कक्ष–क्रमांक एक
दूरध्वनी : (०२५३) २२३०११८

**३. परीक्षा, परीक्षा–अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, प्रमाणपत्र, इत्यादी :**

उपकुलसचिव
परीक्षा कक्ष, युनिट १
दूरध्वनी : (०२५३) २२३०७१६

**४. अध्ययन–साहित्य, पुस्तके इत्यादी :**

भांडार अधिकारी, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी : (०२५३) २२३०१०७

**५. कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता**

**शैक्षणिक सेवा विभाग**
**(Academic Services Division)**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ – २२३००१०
०२५३ – २२३००४७
E-mail: ycmou.asd@gmail.com

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*

**निर्मिती**
श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०२१, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : **जून** २०२१
■ **अक्षरजुळणी** : ओम कॉम्प्युटर्स, नाशिक – ४२२ ००७
■ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB21-22-18**